No. MCS/205/2020-2022. R. N. I. Reg. No.MAHMAR 2006/19943

मुंबई, रविवार, ३ मार्च २०२४

रविवार लोकसत्ता

WWW.LOKSATTA.COM

मुंबई, पुणे, नागपूर, अहमदनगर, छत्रपती संभाजीनगर आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकमान्य, लोकशक्ती!

तापमान
कमाल ३३°से | किमान २२°से
स्थानमानाचा अंदाज
आकाश ढगाळ, पावसाची शक्यता.

लोकरंग
'डेटा'ग्रस्त समाज...

मोदी सरकारची गॅरन्टी
म्हणजे
प्रत्येक गॅरन्टी
पूर्ण होण्याची गॅरन्टी
अधिक माहितीसाठी स्कॅन करा
cbc-22209/13/03/22/23/24
श्रद्धेचा सन्मान, वारसास्थळांचा विकास
आपला संकल्प
विकसित भारत

कविता राऊत मृत्यू-प्रकरणी चौकशी समिती / २
घराणेशाहीला निवडणुकीची भीती / ४
वसईत बसच्या धडकेत दोन मुली गंभीर जखमी / ५
पैशांचा पाऊस पाडण्याच्या प्रलोभनाने लैंगिक शोषण / ८
पाकिस्तानला जाणारी आण्विक सामग्री जप्त /१३

भाजपची पहिली यादी जाहीर; पंतप्रधान मोदी वाराणसीतून | मीनाक्षी लेखी यांच्यासह तीन मंत्र्यांना वगळले | ५७ ओबीसी तर ४७ युवा उमेदवार

३४ केंद्रीय मंत्री रिंगणात

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने १६ राज्ये आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमधील १९५ उमेदवारांची पहिली यादी शनिवारी जाहीर केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा वाराणसीमधून, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा दुसऱ्यांदा गांधीनगरमधून, तर संरक्षणमंत्री राजनाथ सिंह पारंपरिक लखनौमधून निवडणूक लढवतील. या यादीमध्ये ३४ मंत्री, दोन माजी मुख्यमंत्री, २८ महिला आणि सर्वाधिक ५७ ओबीसी उमेदवारांचा समावेश आहे.

दिल्लीत गुरुवारी पंतप्रधान मोदींच्या उपस्थितीत झालेल्या भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकीत प्रामुख्याने 'अ' आणि *(पान १३ वर)*

जाहीर उमेदवार : १९५

- १६ राज्ये आणि दोन केंद्रशासित प्रदेश
- **राज्यनिहाय उमेदवारांची संख्या :** उत्तर प्रदेश- ५१, पश्चिम बंगाल- २०, मध्य प्रदेश-२४, गुजरात-१५, राजस्थान-१५, केरळ-१२, तेलंगणा-०९, आसाम-११, झारखंड-११, छत्तीसगढ-११. दिल्ली-०७. जम्मू-काश्मीर-०२, उत्तराखंड-०३, अरुणाचल प्रदेश-०२, गोवा०१, त्रिपुरा-०१, अंदमान-निकोबार-०१, दीव-दमण-०१.
- ३४ केंद्रीय मंत्री, दोन माजी मुख्यमंत्री व लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांचा समावेश.
- २८ महिला उमेदवारांना प्राधान्य.
- ५० पेक्षा कमी वयोगटातील युवा ४७ उमेदवारांना संधी
- अनुसूचित जातीतील २७ तर अनुसूचित जमातीतील १८ उमेदवार.
- ओबीसी उमेदवार ५७.

महाराष्ट्राचा समावेश नाही

भाजपने ज्या राज्यांमध्ये प्रादेशिक पक्षांशी आघाड्या केल्या आहेत, त्या राज्यांचा निवडणूक समितीच्या बैठकीत विचार करण्यात आला नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील एकाही उमेदवाराची घोषणा करण्यात आली नाही. समितीची पुढील बैठक ४-५ मार्च रोजी होणार आहे.

कृपाशंकर उत्तर प्रदेशातून

महाराष्ट्रातील एकाही जागेवर उमेदवारांची घोषणा करण्यात आली नाही. महाराष्ट्रातील दिग्गज नेत्यांचा पहिल्या यादीत समावेश झालेला नसला तरी, पूर्वाश्रमीचे प्रदेश काँग्रेसचे नेते कृपाशंकर सिंह यांचे भाजपने पुनर्वसन केले असून त्यांना उत्तर प्रदेशमधील जौनपूर मधून उमेदवारी देण्यात आली आहे.

■ तेव्हा कारवाईची मागणी, आता उमेदवारी - पान २

'समृद्धी'वरील पुलाला भगदाड

अमरावतीत महामार्गाची अवघ्या दीड वर्षातच दशा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

अमरावती : नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावर नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील लोहोगावनजीकच्या पुलाला भगदाड पडल्याचे शनिवारी आढळले. त्यामुळे पुलाच्या बांधकाम दर्जाविषयी प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

महामार्गाजवळून काही शेतकरी पायी जात असताना पुलावरील काँक्रीट कोसळले. या घटनेत कुणालाही दुखापत झाली नाही. प्रशासनाला लगेचच या प्रकाराची माहिती देण्यात आली. प्रशासनाने भगदाडाभोवती *(पान १३ वर)*

समृद्धी महामार्गावरील अमरावतीतील लोहोगावनजीकच्या पुलाला भगदाड पडल्याने वाहतूक वळवण्यात आली आहे.

इगतपुरी तालुक्यात उद्घाटनास विरोध

नाशिक : समृद्धी महामार्गालगतची इगतपुरी तालुक्यातील कामे अपूर्ण असताना लोकार्पणाची घाई का, असा प्रश्न शेतकऱ्यांनी तळोशी येथे झालेल्या बैठकीत उपस्थित केला. गावांना जोडणारे रस्ते, रस्त्याची दुरुस्ती इत्यादी अनेक कामे अपूर्ण असल्याचे शेतकऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणले.

मोटरमनच्या ३० टक्के जागा रिक्त

मुंबई : मध्य रेल्वेच्या मुंबई विभागात मोटरमनच्या ३० टक्के जागा रिक्त असल्याने उर्वरित मोटरमनवर अतिरिक्त कामाचा ताण पडत असल्याचे स्पष्ट झाले आहे. मुंबई विभागात मंजूर १,०७६ पदांपैकी ३१३ पदे रिक्त असून फक्त ७६३ मोटरमन कार्यरत आहेत. परिणामी, दररोजच्या १,८०१ लोकल फेऱ्यांचा अतिरिक्त ताण त्यांच्यावर येत असल्याचे रेल्वे कर्मचारी संघटनेचे म्हणणे आहे. - पान ५

मुंबई महापालिकेत ५२ हजार पदे रिक्त

मुंबई : मुंबई महापालिकेत कामगार, कर्मचाऱ्यांची ५२ हजारांहून अधिक पदे रिक्त आहेत. एकूण एक लाख ४५ हजारांहून अधिक पदे मंजूर असून त्यापैकी केवळ ९२ हजार पदांवर कामगार, कर्मचारी कार्यरत आहेत. - पान ३

घोसाळकर हत्या प्रकरण
अमरेंद्र मिश्राचा जामिनासाठी अर्ज

मुंबई : उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर यांच्या हत्येप्रकरणी मॉरिस नरोन्हा याचा अंगरक्षक अमरेंद्र मिश्रा याने शनिवारी सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला. त्याच्या या अर्जाला अभिषेक घोसाळकर यांच्या पत्नी तेजस्विनी यांनी हस्तक्षेप अर्जाद्वारे विरोध केला आहे. न्यायालयाने सगळ्या पक्षकारांची बाजू ऐकल्यानंतर मिश्रा याच्या जामीन अर्जावर मंगळवारी निर्णय देण्याचे स्पष्ट केले. अभिषेक घोसाळकर यांच्यावर ९ फेब्रुवारी रोजी मॉरिसने गोळ्या झाडल्या होत्या. त्यानंतर, त्याने स्वत:वरही गोळी झाडून आत्महत्या केली होती. या प्रकरणात संशयित आरोपी म्हणून मॉरिसचा अंगरक्षक मिश्रा याला पोलिसांनी अटक केली होती.

फडणवीस यांना धमकी; मुख्य आरोपीला अटक

मुंबई : उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ठार मारण्याची धमकी देणारा बीडमधील रहिवासी किचक राधाकृष्ण नवले (३४) याला सांताक्रूझ पोलिसांनी शनिवारी साताऱ्यातून अटक केली. वापूर्वी अटक केलेल्या योगेश सावंत व नवले यांच्यातील संबंधांबाबत पोलीस अधिक तपास करीत आहेत. शिवसेना पदाधिकारी अक्षय पनवेलकर यांच्या तक्रारीवरून याप्रकरणी सांताक्रूझ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. तक्रारीनुसार, समाजमाध्यमांवर एका चित्रफितीमध्ये मुलाखत देणारी व्यक्ती उपमुख्यमंत्री फडणवीस यांना ठार मारण्याबाबत वक्तव्य करीत होती. तसेच यावेळी त्याने दोन जातींमध्ये वाद निर्माण होईल, असेही वक्तव्य केले. 'योगेश सावंत ७७९६' या वापरकर्त्याने ती समाजमाध्यमावर प्रसारित केली होती.

दिनदर्शिका

रविवार, ३ मार्च २०२४
मराठी सौर १३ फाल्गुन शके १९४५
मिती माघ कृष्ण पक्ष
सप्तमी ८:४९ पर्यंत
नक्षत्र : अनुराधा १५:५५ पर्यंत.
पंच : पृथिवी
मुंबई-सूर्योदय : ०७:५७
मुंबई-सूर्यास्त : १८:४४

- मेष : आरोग्य जपा.
- वृषभ : योजना मार्गी लागतील.
- मिथुन : स्पष्ट बोलणे टाळा.
- कर्क : मन प्रसन्न होईल.
- सिंह : सार्वजनिक कार्यात सहभाग.
- कन्या : पारपत्रिक गोष्टींचे आवाड.
- तूळ : लाभ होईल.
- वृश्चिक : शुभ दिवस.
- धनू : नवीन संधीचा.
- मकर : नौकरीज करावे.
- कुंभ : ज्येष्ठांची मदत मिळेल.
- मीन : मानसिक होईल.

शुभ राशी : वृश्चिक, मीन

नोकरभरतीचा लाभ मराठा समाजालाही

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही; बारामतीत नमो महारोजगार मेळाव्याचे उद्घाटन

लोकसत्ता वार्ताहर

बारामती : लोकाभिमुख असलेल्या महायुती सरकारने आतापर्यंत ७५ हजार युवकांना नोकरी दिली आहे. भविष्यात एक लाख ६० हजार युवकांना नोकरी दिली जाणार असून, नोकरभरतीचा लाभ आता मराठा समाजालाही होणार आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी बारामतीमध्ये दिली. तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे, असेही त्यांनी सांगितले.

बारामती येथील विद्या प्रतिष्ठानाच्या कला, शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या नमो महारोजगार मेळावाच्या उद्घाटन कार्यक्रमात एकनाथ शिंदे बोलत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, खासदार सुप्रिया सुळे, सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील, कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा, सुनेत्रा पवार आणि आमदार दत्तात्रय भरणे या वेळी उपस्थित होते. बारामती पोलीस उपमुख्यालय आणि पोलिसांचे निवासस्थान या इमारतींचे व बारामती एसटी बसस्थानकाचे उद्घाटनही शिंदे यांच्या हस्ते झाले.

शिंदे म्हणाले, की नमो महारोजगार मेळावा ही नोकरीसाठी सुवर्णसंधी आहे. राज्यामध्ये वापूर्वी नागपूर, लातूर, नगर या ठिकाणी रोजगार मेळावा घेण्यात आला. या महारोजगार मेळाव्याला प्रचंड प्रतिसाद मिळाल्यानंतरबारामती येथे रोजगार महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

फडणवीस म्हणाले, की पश्चिम महाराष्ट्रामध्ये नमो महारोजगार मेळावा घेण्यात आला. त्यामध्ये ५५ हजार पदे अधिसूचित करण्यात आली आहेत. यातून अनेक तरुणांना रोजगार उपलब्ध होणार आहे. अजित पवार म्हणाले, की उद्योजकांनी आपले उद्योग वाढवून नोकरीच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात. भारताबाहेर अनेक देशांमध्ये नोकऱ्या उपलब्ध आहेत.

जर्मनीमध्ये अनेक नोकऱ्या उपलब्ध असून, त्या संधीचे सोने करण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा. राज्यातील विकास कार्यामध्ये आता बारामतीचा पहिला क्रमांक लागेल, असा मला विश्वास वाटतो.

बारामतीमध्ये झालेल्या नमो महारोजगार मेळाव्याच्या उद्घाटन कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, खासदार सुप्रिया सुळे आदी या वेळी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मिश्कील टिप्पणी
अजित पवारांना गृहमंत्रिपद देणार नाही

पुणे : बारामतीमध्ये अद्ययावत स्वरूपाचे एसटी बसस्थानक झाले आहे. त्याचे बांधकाम विमानतळासारखे आहे. याशिवाय बारामतीमधील पोलीस उपमुख्यालय इमारत, पोलीस निवासस्थानाच्या इमारतीही सुंदर बांधल्या आहेत. राज्यात या पूर्वीच काळात पोलीस इमारतींचे असे सुंदर बांधकाम होण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पीएमसी) म्हणून तुम्हालाच नियुक्त करतो. अजित पवार

'आमच्या केंत्राटाचे दर पाच वर्षांनी नूतनीकरण'

राजकारणात काम करणारे आम्ही सगळे केंत्राटी कामगार आहोत. आमच्या केंत्राटाचे दर पाच वर्षांनी नूतनीकरण होते. आम्ही चांगले काम केले, तर आमच्या केंत्राटाचे नूतनीकरण होते. अन्यथा लोक घरी बसवतात.

मला म्हणतील, की पीएमसी कशाला खातेच माझ्याकडे द्या. पण त्यांना गृहखाते देणार नाही, ते माझ्याकडेच ठेवेन. मात्र, त्यांची मदत नक्की घेऊ, अशी मिश्कील टिप्पणी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी केली. नमो महारोजगार मेळावा आणि विविध विकासकामांच्या उद्घाटन कार्यक्रमात फडणवीस बोलत होते. अजित पवारांच्या नेतृत्वात बारामतीचे बसस्थानक विमानतळासारखे झाले आहे, तर कॉर्पोरेट क्रेपनीप्रमाणे पोलीस उपमुख्यालयाची इमारत उभारण्यात आली आहे.

रोजगाराच्या मुद्द्यावर शरद पवारांची सरकारला साथ

रोजगारनिर्मितीकडे सरकारने लक्ष दिल्याने त्यांचे आभार मानतो. राजकारण बाजूला राहिले, पण मुख्यमंत्री आणि त्यांच्या सहकाऱ्यांना या मुद्द्यावर आमची साथ राहील, अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी दिली. पवार म्हणाले, रोजगाराशी संबंधित हा कार्यक्रम आहे. राज्य सरकारला मी धन्यवाद देऊ इच्छितो, की आज रोजगार निर्माण करण्याची गरज आहे आणि राज्य सरकार ते काम करत आहे. राजकारण बाजूला राहिले. तरुणांना आधार देत आहेत, अशी भूमिका असेल, तर सर्वांनी सहकार्य केले पाहिजे. तीच भूमिका घेऊन मुख्यमंत्री आणि त्यांच्या सहकाऱ्यांना खात्री देतो, की तरुणांच्या हाताला काम देण्यासाठी तुम्ही जे कराल त्यासाठी तुम्हाला साथ असेल. दरम्यान, शरद पवार ब्यासपीठावर येताच मेळाव्याला उपस्थित तरुणांनी जल्लोष केला.

सुप्रिया सुळे यांची टीका

नमो रोजगार मेळाव्यातून सुरुवातीला ४३ हजार नोकऱ्या मिळणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर ३० नोकऱ्या मिळणार असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यांपैकी अनेक पदे ही प्रशिक्षणार्थींची आहेत. त्यामुळे हा महारोजगार मेळावा नसून, महास्किल कार्यक्रम असल्याची टीका खासदार सुप्रिया सुळे यांनी पत्रकारांशी बोलताना केली.

नगर, बीडमध्येही शेकडो अर्ज भरण्याचा मराठा समाजाचा इशारा

नगर, छत्रपती संभाजीनगर : मराठा आरक्षण मागणीसाठी लोकसभा मतदारसंघातून शेकडो उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा इशारा सकल मराठा समाजाच्या नगर आणि बीड येथे झालेल्या बैठकीत देण्यात आला.

नगरमधील बैठकीत आरक्षणाची मागणी पूर्ण होईपर्यंत कोणत्याही नेत्याच्या सभेला न जाण्याचा, कोणत्याही उमेदवाराला मतदान न करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

बीडमध्येही निर्णय

नगरप्रमाणेच बीडमध्येही प्रत्येक गावातून दोन उमेदवार उभे करण्याचा निर्णय सकल मराठा आंदोलकांच्या बैठकीत घेण्यात आला. निवडणुकीच्या माध्यमातून सरकारवर आरक्षण मागणीचा दबाव निर्माण करण्यासाठी हे सारे घडवून आणत असल्याचे या बैठकीत सांगण्यात आले. सरकारने दिलेले १० टक्के आरक्षण मान्य नाही. मराठा समाजाला 'ओबीसी'मधून आरक्षण मिळावे तसेच त्यातील 'सगेसोयरे' याची व्याप्ती आणि व्याख्या सुस्पष्ट करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

कविता राऊत मृत्यूप्रकरणी चौकशी समिती

नंदुरबार: कविता राऊतविषयक घटना अतिशय दुर्दैवी असून शासनाने चौकशी समिती गठीत केली असून समितीच्या अहवालानुसार दोषींवर कारवाईचे संकेत मदत व पुनर्वसन तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अनिल पाटील यांनी दिले. भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याची दक्षता घेण्यासह दुर्गम, अतिदुर्गम भागात आरोग्य व्यवस्था बळकटीकरणासाठी अधिक लक्ष देण्याची ग्वाही त्यांनी दिली.

नंदुरबार जिल्ह्यातील पिंपळखुटाजवळील बर्डीपाडा येथील कविता राऊत ना विवाहितेचा १५ फेब्रुवारी रोजी प्रसूतीनंतर मृत्यू झाला. कविता पिंपळखुटा प्राथमिक आरोग्य केंद्रात रात्री आठच्या सुमारास प्रसूतीसाठी गेल्यावर त्या ठिकाणी डॉक्टर नसल्याने रुग्णवाहिकेतून मोलगी येथील ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले. प्रसूतीनंतर तिची प्रकृती खालावल्याने दुसऱ्या रुग्णवाहिकेतून मोलगी ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आल्यावर तेथून जिल्ह्या रुग्णालयात नेण्यास सांगण्यात आले. या धावपळीतच कविताचा मृत्यू झाला. सातपुड्याच्या दुर्गम भागातील कमकुवत आरोग्य व्यवस्थेची व्यथा 'लोकसत्ता'ने मांडल्यानंतर कवितालाच न्याय देण्यासह तिच्या कुटुंबियांना शासनाने मदत करावी, अशी अपेक्षा जनसामान्यांतून व्यक्त होत आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री पाटील यांनी यासंदर्भात तत्काळ जिल्हा आरोग्य अधिकारी रवींद्र सोनवणे यांना घटनास्थळी पाठवून संबंधीत कुटुंबाची भेट घेण्याचे तसेच चौकशी समिती नेमण्याचे आदेश दिल्याचे सांगितले. दरम्यान, आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित हे दिवसभर कार्यक्रमांमध्ये व्यग्र असल्याने त्यांच्याकडून कोणतीही प्रतिक्रिया प्राप्त झाली नाही.

राहुल गांधी यांची १६ मार्चला ठाण्यात सभा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

ठाणे : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ठाणे जिल्ह्यातून काँग्रेस नेते राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा १५ आणि १६ मार्च रोजी जाणार आहे. या यात्रेदरम्यान राहुल गांधी हे ठाणे शहरात सभा घेणार आहेत.

भारत जोडो न्याय यात्रा भिवंडी आणि ठाणे शहरातून जाणार आहे. या यात्रेचे नियोजन आणि कार्यक्रमांची आखणी करण्यासंदर्भात काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी शनिवारी ठाणे काँग्रेस मुख्यालयात बैठक घेऊन कार्यकर्त्यांना सूचना केल्या.

ही यात्रा १२ मार्चला गुजरातमधून राज्यातील नंदुरबार जिल्ह्यात प्रवेश करणार आहे. त्यानंतर धुळे, मालेगाव, नाशिक मार्गे ती १५ मार्चला वाडा, भिवंडी येथे येणार आहे. या दिवशी ते भिवंडीत थांबणार आहेत. १६ मार्चला ही

यात्रा ठाणे शहरात येणार आहे. या यात्रेदरम्यान राहुल गांधी यांची सभा होणार आहे. यानंतर ही यात्रा मुलुंड येथे थांबेल आणि १७ मार्चला दादर चैत्यभूमी येथे यात्रेचा समारोप होईल, अशी माहिती बाळासाहेब थोरात यांनी दिली.

भिवंडी येथून मुंबई-नाशिक महामार्गे भारत जोडो न्याय यात्रा खारेगाव मार्गे मुंब्रा-कौसा, कळवा, कोटनाका, जांभळीनाका, राम मारुती रोड, गोखले रोड, तीन हात नाका येथून मुलुंडला जाईल. जांभळी नाका येथे राहुल गांधी हे यात्रेच्या वाहनावरूनच सभा घेऊन संवाद साधणार आहेत.

पालिका शिक्षकांना निवडणुकीचे काम

मुंबई : मुंबईतील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांना निवडणुकीच्या कामातून वगळण्याचे आदेश मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी दिलेले असले तरी पालिकेच्या शाळेतील शिक्षकांची यातून सुटका झालेली नाही. शिक्षकांनी दोन दिवस निवडणुकीचे काम व चार दिवस शाळेतील काम करावे, असे आदेश आता पालिकेच्या शिक्षण विभागाने दिले आहेत. तरी निवडणूक विभागाच्या अधिकाऱ्यांनी शिक्षकांना सातही दिवस निवडणूक कामावर जाण राहण्यास बजावले आहे.

शिक्षकांना निवडणुकीच्या कामासाठी जूंपल्यामुळे परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांचे नुकसान होणार असल्याचा मुद्दा उपस्थित झाला होता. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि आमदार कपिल पाटील यांनी या निर्णयाला विरोध केला होता. त्यानंतर निवडणूक अधिकाऱ्यांनी इतर शिक्षकांवरील या जबाबदारीचा भार हलका केला होता.

तेव्हा कारवाईची मागणी, आता कृपाशंकर सिंह भाजपचे उमेदवार

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : बेहिशेबी मालमत्ताप्रकरणी कारवाई करावी म्हणून तेव्हा मागणी करणाऱ्या भाजपने आता याच कृपाशंकर सिंह यांना उत्तर प्रदेशमधील जौनपूर मतदारसंघातून लोकसभेची उमेदवारी जाहीर केली आहे. कृपाशंकर सिंह काँग्रेसमध्ये असताना भाजपने त्यांच्या विरोधात आघाडी उघडली होती.

बेहिशेबी मालमत्ताप्रकरणी कृपाशंकर सिंह यांच्या विरोधात कारवाई व्हावी म्हणून भाजपने मागणी केली होती. कृपाशंकर सिंह यांच्या विरोधात लढा देणाऱ्या संजय तिवारी यांना भाजपने पडद्याआडून मदत केल्याची तेव्हा चर्चा होती.

कृपाशंकर सिंह यांच्या विरोधात खटला दाखल करण्यासाठी तत्कालीन विधानसभा अध्यक्ष दिलीप वळसे-पाटील यांनी नकार दिला असता या विरोधात आवाज उठविण्यात तत्कालीन विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते विनोद तावडे आघाडीवर होते. विशेष म्हणजे याच विनोद तावडे यांनी पत्रकार परिषदेत कृपाशंकर सिंह यांची उमेदवारी जाहीर केली. केंद्र व राज्यात सत्ताबदल होताच कृपाशंकर सिंह हे भाजप नेत्यांच्या जवळ गेले होते.

केंद्रातील भाजपच्या एका वरिष्ठ नेत्याने कृपाशंकर सिंह यांना बरीच मदत केल्याची तेव्हा चर्चा होती. राज्यात भाजपची सत्ता असताना कृपाशंकर सिंह यांच्या विरोधात खटल्यात सरकारी पक्षाने काहीशी नमती भूमिका घेतल्याची कुजबुज तेव्हा होती. पुढील काळात कृपाशंकर सिंह यांची बेहिशेबी मालमत्ता प्रकरणात न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली होती. २०१९च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी कृपाशंकर सिंह यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता.

जौनपूरमध्ये चुरस

गेले वर्षभर जौनपूर या आपल्या मूळ गावी अधिक लक्ष केंद्रित केले होते. जौनपूर हा यादवबहुल मतदारसंघ असल्याने कृपाशंकर सिंह यांच्यासाठी लढत चुरशीची असेल. २०१९ च्या निवडणुकीत बहुजन समाज पक्षाचे शामसिंह यादव हे सुमारे ८० हजार मतांनी विजयी झाले होते.

पंढरपूरमधील गावात मराठा तरुणांचा विरोध
आमदार बबनराव शिंदे यांच्या मुलास गावबंदी

लोकसत्ता वार्ताहर

पंढरपूर : माढ्याचे आमदार बबनराव शिंदे यांचे पुत्र रणजित शिंदे यांना शनिवारी तुंगत गावात प्रवेश करण्यास मराठा समाजाच्या काही तरुणांनी विरोध केला. मराठा आरक्षणप्रश्नी राजकीय नेत्यांविरोधात 'गावबंदी' आंदोलनाची हाक देण्यात आली होती.

तुंगत येथे विकासकामांच्या पायाभरणीसाठी रणजित शिंदे आले होते. एक कार्यक्रम पार पडल्यानंतर त्यांना गावातील काही मराठा तरुणांनी विरोध केला. ''राजकीय व्यक्तींना गावबंदी असतानाही तुम्ही एका कार्यक्रमाचे उद्घाटन केले. आम्ही तुमचा मान राखला. आता तुम्ही परत जा'', अशी भूमिका घेत तरुणांनी शिंदे यांना उर्वरित कार्यक्रमांना उपस्थित राहण्यास विरोध केला.

''मी विकासकामांसाठी आलो आहे. हवे तर सरपंचांच्या हस्ते विकासकामांचा प्रारंभ करा. परंतु विकासकामांच्या आड येऊ नका,'' असे आवाहन रणजित शिंदे यांनी आंदोलकांना केले.

STATEMENT ABOUT OWNERSHIP AND OTHER PARTICULARS OF RAVIVAR LOKSATTA, MUMBAI, AS REQUIRED UNDER RULE 8 OF THE REGISTRATION OF NEWSPAPERS (CENTRAL) RULES, 1956.
FORM IV
(SEE RULE 8)

1. Place of Publication : Mafatlal Centre, 7th Floor, Ramnath Goenka Marg, Nariman Point, Mumbai-400 021.
2. Periodicity of its publication : Weekly (Sunday)
3. Printer's Name : Vaidehi Thakur
   Whether Citizen of India : Yes
   Address : Mafatlal Centre, 7th Floor, Ramnath Goenka Marg, Nariman Point, Mumbai-400 021.
4. Publisher's Name : Vaidehi Thakur
   Whether Citizen of India : Yes
   Address : Mafatlal Centre, 7th Floor, Ramnath Goenka Marg, Nariman Point, Mumbai-400 021.
5. Editor's Name : Girish Kuber
   Editor
   Whether Citizen of India : Yes
   Address : Mafatlal Centre, 7th Floor, Ramnath Goenka Marg, Nariman Point, Mumbai-400 021.
6. Name and address of individuals who own the newspaper : The Indian Express (P) Ltd. Mafatlal Centre, 7th Floor, Ramnath Goenka Marg, Nariman Point, Mumbai-400 021.

   AND
   Shareholders holding more than one per cent of the total capital : Indian Express Holdings & Entp Private Limited Mafatlal Centre, 7th Floor, Ramnath Goenka Marg, Nariman Point, Mumbai-400 021.
   : Mr. Vivek Goenka & Mr. Amrit Goenka Mafatlal Centre, 7th Floor, Ramnath Goenka Marg, Nariman Point, Mumbai-400 021.
   : Mr. Shekhar Gupta & Mrs. Neelam Jolly C-6/53, Safdarjung Development Area, New Delhi-110 016.

I, Vaidehi Thakur, hereby declare that the particulars given above are true and to the best of my knowledge and belief.

Sd/-
Vaidehi Thakur
Publisher

Date : 03.03.2024

अमित शहा मंगळवारी राज्याच्या दौऱ्यावर

नागपूर : आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा ५ मार्चला महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत असून अकोला, जळगाव व छत्रपती संभाजीनगर येथील कार्यक्रमात उपस्थित राहणार आहेत.

शहा हे अकोला व जळगाव व संभाजीनगर येथील कार्यक्रमात उपस्थित राहणार असून ते अकोला येथे चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ, बुलढाणा, अकोला व अमरावती या लोकसभा क्षेत्रातील निवडणूक व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधणार आहेत. त्यानंतर दुपारी २ वाजता जळगाव येथे युवा महासंमेलनाला मार्गदर्शन करतील. सायंकाळी ६ वाजता छत्रपती संभाजीनगर येथे कार्यकर्त्यांचा मेळावा होईल.

चाळीत कांदा ५० टक्क्यांपर्यंत सडतो?

दत्ता जाधव, लोकसत्ता

पुणे : राज्यातील कांदा लागवडीखालील क्षेत्र आणि उत्पादनात दुपटीने वाढ झाली असली तरीही कांदा साठवण क्षमतेत अपेक्षित वाढ झाली नाही. आजही कांदा साठवण चाळी पारंपरिक पद्धतीने उभारल्या जात आहे. चाळीतील थंडी, उष्णता आणि आद्रतां नियंत्रित करता येत नसल्यामुळे साठवणूक केलेल्या कांद्यापैकी ५० टक्के कांदा सडून जात असल्याचे निरीक्षण समितीने नोंदविले आहे.

साठवणुकीनंतर पहिल्या ३० दिवसांत (मे ते जून) आठ टक्के कांद्याचे नुकसान होते. ६० दिवसांत (मे ते जुलै) १२ टक्के कांद्याचे नुकसान होते. ९० दिवसांत (मे ते ऑगस्ट) २३ टक्के कांद्याचे नुकसान होते. १२० दिवसांत (मे ते सप्टेंबर) ३० ते ३५ टक्क्यांपर्यंत नुकसान होते. १५० दिवसांत (मे ते ऑक्टोबर) ३५ ते ४५ टक्क्यांपर्यंत नुकसान होते. आणि १८० दिवस कांदा चाळीत राहिल्यास (मे ते नोव्हेंबर) साठवणूक केलेल्या कांद्यापैकी ४५ ते ६० टक्क्यांपर्यंत नुकसान होते. पारंपरिक कांदा चाळीत होणारे नुकसान टाळण्यासाठी तापमान, आद्रतां नियंत्रित ठेवण्याची क्षमता असलेल्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने कांदा चाळी उभारण्याची गरज आहे.

अति आद्रतेंमुळे चाळीत साठवलेल्या कांद्याला कोंब फुटून तो खराब होतो. हे नुकसान टाळण्यासाठी भाभा अणु संशोधन केंद्राने नवी मुंबई आणि लासलगाव येथे विकिरण प्रकल्प उभारले आहेत. या तंत्रज्ञानाचा वापर केल्यास कांद्याचे नुकसान टाळणे शक्य आहे का, तसेच ही प्रक्रिया करण्यासाठी येणारे खर्च आणि कांदा विक्रीतून मिळणारी रक्कम यांची आर्थिक व्यवहार्यता तपासण्यासाठी तांत्रिक तज्ज्ञांची अभ्यास समिती नेमावी, अशी शिफारस समितीने केली आहे.

> रब्बी हंगामातील कांदा काढल्यानंतर तीन दिवस शेतात आणि पंधरा दिवस सावलीत वाळविल्यानंतर तंत्रशुद्ध पद्धतीने कांदा चाळीत साठवला जातो, असे राजगुरूनगरमधील कांदा व लसून संशोधन केंद्राने सांगितले.

संशोधित वाणांची लागवड करण्याची शिफारस

- काढणी पश्चात निर्यातक्षम, दर्जेदार कांद्याचे नुकसान होऊ नये, यासाठी निर्यातयोग्य संशोधित कांदा वाणाची लागवड करण्याची आणि कांदा चाळीच्या उभारणीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची शिफारसही समितीने केली आहे.
- भीमा शुभ्रा, भीमा सफेद, भीमा श्वेता, अकोला सफेद, ॲग्री फाउंड व्हाईट, या पाच पांढऱ्या नवीन कांद्याच्या लागवडीची शिफारस समितीने केली आहे. ही वाणे कांदा प्रक्रिया उद्योगासाठी उपयोगी आहेत.
- युरोपसह अन्य देशांत निर्यातीसाठी अर्ली ग्रॅनो, यलो ग्लोब, फुले सुवर्णा या संशोधित वाणाची लागवड करण्याची शिफारसही समितीने केली आहे.

मुंबई महापालिकेत ५२ हजार पदे रिक्त

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : मुंबई महापालिकेत कामगार, कर्मचाऱ्यांची तब्बल ५२ हजारांहून अधिक पदे रिक्त असल्याचे उघडकीस आले आहे. पालिकेत एकूण एक लाख ४५ हजारांहून अधिक पदे मंजूर असून त्यापैकी केवळ ९२ हजार पदांवर कामगार, कर्मचारी कार्यरत असल्याचे माहिती अधिकारातून पुढे आले आहे.

मुंबईतील लोकसंख्येत दिवसेंदिवस वाढ होत असली तरी मुंबई महापालिकेतील कामगार, कर्मचाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. दरवर्षी मोठ्या संख्येने कामगार, कर्मचारी सेवानिवृत्त होत असून त्यांची पदे भरली जात नसल्यामुळे रिक्त पदांची संख्या वाढत आहे. सव्वाकोटी लोकसंख्येला नागरी सेवा देणाऱ्या मुंबई महापालिकेत तब्बल १२९ खाती आहेत. त्यातील काही विभाग अत्यावश्यक सेवेत येतात. नागरिकांना सेवा देण्यासाठी नवीन विभाग तयार करण्यात आले असले तरी त्यासाठी लागणारे मनुष्यबळ भरती केले जात नाही.

सेवानिवृत्ती, कामगारांच्या मृत्युमुळे रिक्त पदांची संख्या दरवर्षी वाढत आहे. गेली अनेक वर्षे भरती न झाल्यामुळे ५२ हजारांहून अधिक पदे रिक्त असल्याचे माहिती अधिकारातून पुढे आली आहे. ही पदे तत्काळ भरावीत, अशी मागणी कर्मचारी कामगार सेनेने केली आहे.

आयुक्तांना कर्मचारी कामगार सेनेचे पत्र

महापालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल यांना पत्र पाठवून रिक्त पदे भरण्याची मागणी म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेचे उपाध्यक्ष संजय बापेरकर यांनी केली आहे. रिक्त पदे कंत्राटी पद्धतीने भरली जात असली तरी दैनंदिन स्वरूपाचे व अत्यावश्यक पद्धतीचे काम कंत्राटी कामगारांकडून करून घेतले जात असून ते उचित नाही, असेही या पत्रात म्हटले आहे.

> पालिका कर्मचाऱ्यांच्या एका वारसाला पालिकेच्या सेवेत घ्यावे, कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्यांचा अनुभव लक्षात घेऊन त्यांना पदावर कायम करावे, तसेच रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू करावी.
> - बाबा कदम, अध्यक्ष, म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेना

दहिसर येथे सिमेंट मिक्सरने ६ वर्षांच्या मुलाला चिरडले

लोकसत्ता खास प्रतिनिधी

मुंबई: पश्चिम द्रुतगती मार्गावर दहिसर चेकनाक्याजवळ सिमेंट मिक्सरने सहा वर्षांच्या मुलाला चिरडल्याची घटना शुक्रवारी घडली. सिमेंट मिक्सरचालकाने दुचाकीला धडक दिली.

याप्रकरणी दहिसर पोलिसांनी सिमेंट मिक्सरचालकाविरोधात गुन्हा दाखल केला. तक्रारदार सीमा गुप्ता (४२) या मीरा रोड येथील रहिवासी आहेत. त्या कांदिवली येथील साई रुग्णालयात जनसंपर्क अधिकारी म्हणून काम करतात. त्या आपला मुलगा नकुल गुप्ता (६) याच्यासह दुचाकीवरून जात होत्या. त्यावेळी सिमेंट मिक्सरचालकाने अचानक डाव्या बाजूला वळण घेत दुचाकीला धडक दिली.

साकीनाका येथे गोदामाला आग

मुंबई : अंधेरी- कुर्ला मार्गावरील साकीनाका परिसरातील एक मजली गोदामाला सकाळी ९ च्या सुमारास आग लागली. या आगीमध्ये १५ हजार चौरस फुटांवरील जागेतील लाकडी सामान, कपडे, यंत्रसामग्री, कागदाचे गठ्ठे जळून खाक झाले.

साकीनाका परिसरात जरीमरी बस स्टॉप परिसरात असलेल्या दोन गाळ्यांना अचानक आग लागली. या आगीचे कारण समजू शकलेले नाही.

विरार - सुरतदरम्यान आज ब्लॉक

मुंबई : पश्चिम रेल्वेवर मिशन रफ्तार प्रकल्पाचे काम सुरू असून मिशन रफ्तार अंतर्गत मुंबई - सुरत - वडोदरा - दिल्ली आणि मुंबई - वडोदरा - अहमदाबाद या विभागांवर ताशी १६० किमी वेगाने रेल्वेगाड्या धावण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. या प्रकल्प कामासाठी विरार - सुरतदरम्यान ब्लॉक घेण्यात येणार आहे. रविवारी सकाळी ९.१० ते १०.३० दरम्यान हा ब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे काही लोकल आणि रेल्वेगाड्यांवर परिणाम होणार आहे.

ब्लॉक कालावधीत गाडी क्रमांक १२९३४ अहमदाबाद - मुंबई सेंट्रल कर्णावती एक्स्प्रेस रविवारी २५ मिनिटे विलंबाने धावेल. तर, सकाळी ७.१७ ची चर्चगेट - डहाणू रोड लोकल वाणगावपर्यंत तर सकाळी ९.३७ वाजेची डहाणू रोड-विरार लोकल डहाणू रोडऐवजी वाणगाववरून सकाळी ९.५० वाजता सुटेल. ७.४२ ची चर्चगेट - डहाणू रोड लोकल वाणगावपर्यंत चालवण्यात येईल.



संक्षिप्त

त्रिपुराच्या समस्यांसंबंधी त्रिपक्षीय करार

नवी दिल्ली: तिपरा मोथा, त्रिपुरा सरकार तसेच केंद्रादरम्यान आज येथे त्रिपक्षीय करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आली. यामुळे राज्यातील स्थानिकांच्या समस्या सुटणार असल्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सांगितले. या करारानुसार स्थानिकांच्या जमीन, राजकीय हक्क, आर्थिक विकास, संस्कृती, भाषा याबाबतचे मुद्दे सहमतीने सोडवण्यास मान्यता देण्यात आली.

स्पॅनिश पर्यटकावर सामूहिक बलात्कार

दुमका : झारखंडच्या दुमका जिल्ह्यामध्ये एका स्पॅनिश पर्यटकावर सामूहिक बलात्कार झाल्याची माहिती पोलिसांनी शनिवारी दिली. या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आली असून, उरलेल्या संशयितांना पकडण्यासाठी पोलिसांनी मोहीम हाती घेतली आहे.

भारतातील शास्त्रीय नर्तकाची अमेरिकेत हत्या

न्यूयॉर्क : कूचीपुडी व भरटनाट्यम नर्तक अमरनाथ घोष यांची अमेरिकेतील सेंट लुईस शहरात गोळ्या घालून हत्या करण्यात आली. ते वॉशिंग्टन विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षण घेत होते. पोलिसांनी सांगितले की, डेलमार बुलेवर्ड येथे मंगळवारी संध्याकाळी ७.१५ वाजता हा गोळीबार झाला.

केरळमध्ये कुलगुरू निलंबित

तिरुवअनंतपुरम : केरळचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांनी राज्यातील पशुवैद्यकीय आणि प्राणी विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. एम आर शशींद्रनाथ यांना शनिवारी निलंबित केले. या विद्यापीठातील एका विद्यार्थ्याच्या मृत्युनंतर ही कारवाई करण्यात आली आहे.

घराणेशाहीला निवडणुकीची भीती

पंतप्रधान मोदी यांची बिहारमधील समेत राजद, काँग्रेसवर टीका

पीटीआय, औरंगाबाद, बेगुसराय

घराणेशाहीतून राजकारणात आलेल्यांना आगामी लोकसभा निवडणूक लढवण्याची भीती वाटत असून ते राज्यसभेच्या मार्गाने संसदेत प्रवेश करण्याचा प्रयत्न करत आहेत अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिहारमधील औरंगाबादमध्ये बोलताना केली. भ्रष्टाचार, घराणेशाहीचे राजकारण यावर पांघरूण घालण्यासाठी काँग्रेस आणि राजदने दलित आणि इतर वंचित घटकांचा वापर करून घेतला असा आरोप त्यांनी केला.

मोदी यांनी शनिवारी औरंगाबाद आणि बेगुसराय येथे जाहीर सभांमध्ये राष्ट्रीय जनता दल आणि काँग्रेसला लक्ष्य केले. यावेळी मुख्यमंत्री नितीशकुमार हेही त्यांच्याबरोबर व्यासपीठावर उपस्थित होते.

औरंगाबादमधील सभेत काँग्रेस-राजद आघाडीवर टीका करताना मोदी म्हणाले की, ''घराणेशाहीने सत्तेवर आलेल्यांना आणि लोकांच्या मनात दहशत बसवणाऱ्यांना रालोआने काठावर ढकलले आहे''. बिहारमध्ये विकास, कायद्याचे राज्य आणि महिलांना भीतीमुक्त जीवन मिळेल याची खबरदारी घेणे ही आपली हमी असल्याचा दावा त्यांनी यावेळी केला. राज्यातील आधीच्या पिढ्या भीतीमध्ये जगत होत्या आणि त्यांनी स्थलांतर करावे लागले. आपण तो काळ पुन्हा येऊ देता कामा नये असे म्हणत त्यांनी राजदवर टीका केली.

यावेळी बोलताना मोदी यांनी बिहारमध्ये पुन्हा एकदा दुहेरी-इंजिन सरकार आल्याचा उल्लेख केला. ते पुढे म्हणाले की, बिहार ही देवी सीतेची भूमी असून अयोध्येत राम मंदिर बांधल्यानंतर राज्यातील उत्साह जाणवण्यासारखा होता. माजी मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर यांना भारतरत्न मिळणे हा संपूर्ण बिहारचा सन्मान असल्याचेही मोदी यांनी सांगितले.

बेगुसरायमध्ये बोलताना मोदी यांनी माजी रेल्वेमंत्री लालू प्रसाद यादव आणि त्यांच्या कुटुंबीयांना अडचणीत आणणाऱ्या नोकऱ्यांसाठी जमीन घोटाळ्याचा उल्लेख केला. काँग्रेस आणि राजदने सामाजिक न्यायाचा विश्वासघात केला असा आरोप त्यांनी केला.

बिहारमधील औरंगाबादमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या उपस्थितीत विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन करण्यात आले.

१.६२ लाख कोटींच्या प्रकल्पांचे उद्घाटन

बेगुसराय : पंतप्रधान मोदी यांनी बेगुसरायमध्ये तेल आणि वायू क्षेत्रातील १.६२ लाख कोटींच्या अनेक प्रकल्पांना सुरुवात केली. हे प्रकल्प बिहार, हरियाणा, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, पंजाब आणि कर्नाटक या राज्यांमध्ये उभारले जाणार आहेत. यावेळी त्यांनी काही रेल्वेसेवांनाही हिरवा झेंडा दाखवला.

कायम रालोआमध्येच राहणार -नितीशकुमार

औरंगाबादमधील सभेत बोलताना मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी आपण यापुढे भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीमध्येच राहणार असल्याचे आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिले. "तुम्ही यापूर्वी बिहारमध्ये आला होता त्यावेळी मी कही काळ रालोआमध्ये नव्हतो, आता मात्र रालोआमध्येच राहणार आहे", असे ते म्हणाले.

तपासासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करा

बंगळुरू स्फोट प्रकरणी मुख्यमंत्र्यांचे पोलीस अधिकाऱ्यांना निर्देश

पीटीआय, बंगळुरू

बंगळुरूमधील 'रामेश्वरम कॅफे'मध्ये शुक्रवारी दुपारी झालेल्या बॉम्बस्फोटाचा तपास करण्यासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करा असे निर्देश मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी शनिवारी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना दिले. या घटनेतील संपूर्ण सत्य बाहेर आले पाहिजे असे त्यांनी अधिकाऱ्यांना बजावले. शहरातील या लोकप्रिय कॅफेमध्ये दुपारच्या जेवणाच्या वेळी झालेल्या स्फोटामध्ये १० जण जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

शनिवारी मुख्यमंत्री सिद्धरामय्या, गृहमंत्री जी परमेश्वर आणि गृह खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक झाली. त्यावेळी सिद्धरामय्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना स्फोटासाठी जबाबदार असलेल्या समाजकंटकांना कोणतीही दयामाया न दाखवता त्यांच्याविरोधात कारवाई करण्यास सांगितले. गर्दीच्या ठिकाणी गस्त वाढवण्यासारख्या सूचनाही त्यांनी दिल्या. पुन्हा अशा घटना होऊ नयेत यासाठी या स्फोटाचा तपास वेगाने पूर्ण करण्यास त्यांनी सांगितले. खबरदारीचा उपाय म्हणून विमानतळ, क्रिकेट स्टेडिमव, बस स्थानके, रेल्वे स्टेशन आणि गर्दीच्या अन्य ठिकाणी सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे.

शनिवारी सकाळी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली तसेच रुग्णालयामध्ये जखमींची भेट घेऊन विचारपूस केली. या स्फोटातील दोषींच्या हालचाली कॅमेरामध्ये कैद झालेल्या असल्यामुळे, त्याला पकडणे सोपे असेल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. या स्फोटामागे कोणत्याही संघटनेचा हात आहे का हे अद्याप समजले नसल्याचेही त्यांनी सांगितले. या घटनेतील संशयितांकडे एक पिशवी होती. त्याने स्वतःची ओळख लपवण्यासाठी टोपी घातली होती आणि चेहरा झाकला होता.

दरम्यान, या बॉम्बस्फोटाचा तपास केंद्रीय गुन्हे शाखेकडे (सीसीबी) सोपवण्यात आला असल्याची माहिती शहराचे पोलीस आयुक्त बी दयानंद यांनी शनिवारी दिली. चौकशीसाठी धारवाड, हुबळी आणि बंगळुरूमधून चार जणांना ताब्यात घेण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली होती. मात्र, आतापर्यंत कोणालाही अटक करण्यात आलेली नाही असे आयुक्तांनी स्पष्ट केले. यासंबंधी 'एक्स'वर अधिक माहिती देताना त्यांनी सांगितले की, सर्व जखमी बरे होत असून तपास वेगाने सुरू आहे.

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी घटनास्थळाची पाहणी केली.

काँग्रेसचे 'एमएसपी'चे आश्वासन

पीटीआय, भोपाळ

लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसच्या जाहीरनाम्यामध्ये शेतकऱ्यांना कायदेशीरपणे किमान आधारभूत किंमत (एमएसपी) आणि जातीनिहाय जनगणना यांचा समावेश आहे असे पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी शनिवारी सांगितले. 'भारत जोडो न्याय यात्रा' पाच दिवसांच्या विश्रांतीनंतर सुरू झाली. राजस्थानातून मध्य प्रदेशात प्रवेश करताना मोरेना येथे बोलताना राहुल यांनी हे मुद्दे उपस्थित केले.

'इंडिया' आघाडी सत्तेवर आली तर 'एमएसपी' आणि जातीनिहाय जनगणना हे कार्यक्रम प्राधान्याने हाती घेतले जातील असे राहुल यांनी सांगितले. देशातील १० ते १५ उद्योगपतींचे १६ लाख कोटींचे कर्ज माफ केले जात असताना शेतकऱ्यांना 'एमएसपी' दिली जात नाही अशी टीका त्यांनी केली.

जामनगर विमानतळाला १० दिवसांसाठी आंतरराष्ट्रीय दर्जा

अंबानीच्या मुलाच्या विवाहपूर्व सोहळ्यासाठी जगभरातील दिग्गजांची उपस्थिती

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

गुजरातमधील जामनगर येथे भारतीय बाबू दलाच्या अखत्यारीत असलेल्या विमानतळाला १० दिवसांसाठी आंतरराष्ट्रीय विमानतळाचा दर्जा देण्यात आला आहे. 'रिलायन्स' उद्योग समूहाचे प्रमुख मुकेश अंबानी यांचा सर्वात धाकटा मुलगा अनंत आणि 'एनकोअर हेल्थकेअर'चे मुख्य कार्यकारी अधिकारी विरेन मर्चंट यांची मुलगी राधिका यांच्या विवाहपूर्वीचे काही समारंभ जामनगर येथे होत आहेत.

तीन दिवस चालणाऱ्या या सोहळ्यासाठी बिल गेट्स, मार्क झुकेरबर्ग, इवांका ट्रम्प यांच्यासह अनेक मोठे पाहुणे आले आहेत. त्यांच्या सोयीसाठी जामनगर विमानतळावर २५ फेब्रुवारी ते ५ मार्च या कालावधीमध्ये आंतरराष्ट्रीय विमाने उतरण्यास आणि त्यांच्या उड्डाणांना परवानगी देण्यात आली आहे अशी माहिती विमानतळ अधिकाऱ्याने दिली.

या विमानतळावर शुक्रवारपासून चार दिवसांच्या कालावधीत ४०० विमानांचे व्यवस्थापन केले जाईल. तिथे नागरी विमाने उभी करण्यासाठी स्वतंत्र जागा नसल्याने ती राजकोट, पोरबंदर, अहमदाबाद आणि मुंबईतील विमानतळांवर उभी केली आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, तात्पुरते 'कस्टम, इमिग्रेशन आणि क्वारंटाईन' काउंटर सुरू करण्यासाठी केंद्रीय गृह खात्यासह आरोग्य आणि अर्थ खात्याच्या संसाधनांचा वापर करण्यात आला.

आणखी नऊ आमदार संपर्कात!

'हिमाचल'मधील काँग्रेसच्या बंडखोर आमदाराचा दावा

पीटीआय, सिमला

हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंह सुख्खू यांच्या कार्यपद्धतीमुळे काँग्रेसचे आणखी नऊ आमदार अस्वस्थ असून ते आपल्या संपर्कात असल्याचा दावा पक्षाचे बंडखोर आमदार राजिंदर राणा यांनी शनिवारी केला. राज्यसभा निवडणुकीसाठी मतदानाच्या वेळी राणा यांच्यासह सहा आमदारांनी भाजपला मतदान केले होते. ते सर्व विश्वासदर्शक ठराव व वित्त विधेयकावर मतदानाच्या वेळी गैरहजर राहिल्यामुळे त्यांच्यावर अपात्रतेची कारवाई करण्यात आली आहे.

पीटीआयला दिलेल्या मुलाखतीत राणा म्हणाले की, मुख्यमंत्री सुख्खू यांचे मित्र राज्य सरकार चालवत आहेत. त्यामुळे निवडून आलेले लोकप्रतिनिधी, विशेषत: मंत्र्यांना गुदमरल्यासारखे आणि अवमानित वाटत आहे असा आरोप त्यांनी केला. सुख्खू हे खोटारडे असून तथ्यांची मोडतोड करण्याचा प्रयत्न करत आहेत असा आरोपही राणा यांनी केला.

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक

प्रस्तुत

लोकसत्ता स्पर्धा परीक्षा गुरु ३

व्यवसायाची होई भरभराट, जेंव्हा असेल, 'टीजेएसबी संयुक्ता अकाउंट' ची साथ!

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक

Bharose ka Bank Bhavishya ka Bank

www.tjsbbank.co.in

Toll Free : 1800 223 466 / 1800 266 3466

यूपीएससी

यूपीएससी परीक्षेची पूर्वतयारी (भाग १)

'**Well Begun** is half done' म्हणजे 'योग्य सुरुवात केल्यास ते काम निम्मे अधिक पूर्ण झाल्यासारखे' असते. म्हणूनच, यूपीएससी परीक्षेची देखील तयारी करताना ही खूणगाठ मनाशी पक्की बांधावी.

या परीक्षेचे स्वरूप जाणून घेतल्यानंतर या परीक्षेच्या प्रत्यक्ष तयारीला लागण्यापूर्वी या परीक्षेच्या अभ्यासक्रमाचे सूक्ष्म आकलन, मागील प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण, संदर्भ पुस्तकांचे संकलन आणि अभ्यास, आपल्या क्षमतांचे नियोजन आणि आयोगाच्या उमेदवाराकडून असलेल्या अपेक्षा या काही बाबींसाठी जाणीवपूर्वक वेळ देऊन पुढील गोष्टी कराव्यात.

१) अभ्यासक्रम व अभ्यासक्रमातील संकल्पना

आयोगाने निर्धारित केलेला अभ्यासक्रम समजून घेत असताना आयोगाला त्यातून नेमके काय अपेक्षित आहे, ते समजून घ्यावे. आपण GS चा अभ्यास करताना त्यातील संकल्पना समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. C-SAT च्या बाबतीतही Logical Reasoning, Data Interpretation, Reading Comprehension या संकल्पना नीट समजून घेतल्या तरच प्रश्न सोडवता येतील.

२) गतवर्षीच्या प्रश्नपत्रिका अभ्यासणे

कुठलीही परीक्षा समजून घेण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे संबंधित परीक्षेच्या गतवर्षीच्या प्रश्नपत्रिका होय. यावरून दोन बाबी स्पष्ट होतात - १) प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, त्यात कालानुरूप होणारे बदल. आणि **२) प्रश्न विचारण्याची पद्धती.** या दोन बाबी जर नीट लक्षात घेतल्या तरच आपण या परीक्षेला यशस्वीरित्या सामोरे जावू शकतो. यासाठी किमान मागील १० वर्षांतील प्रश्नपत्रिका अभ्यासाव्यात.

३) मोजक्या संदर्भ पुस्तकांचे जास्त वेळा वाचन

यूपीएससी परीक्षेकरिताची संदर्भ पुस्तके काळजीपूर्वक निवडावीत. याकरिता 'गतवर्षीच्या प्रश्नपत्रिकांचा आधार' व 'विद्यार्थ्यांचे अनुभव' या दोन घटकांचा विचार करणे कधीही लाभकारक ठरेल. कमीत कमी पुस्तके जास्तीत जास्त वेळा वाचल्यास त्यातून चांगले गुण मिळतात. खोडक्यात, एका विषयासाठी दहा पुस्तके वाचण्याऐवजी एक चांगले पुस्तक किमान दहा वेळा वाचावे.

४) इंटरनेटचा हुशारीने वापर

स्पर्धा परीक्षेतील प्रश्नपत्रिकांचे नेमके स्वरूप पाहिल्यास पुस्तकांच्या मर्यादाही स्पष्ट होतात. त्यामुळे 'इंटरनेट' हे माध्यम पुढे येते. एखाद्या विषयाबद्दल सखोलपणे जाणून घेण्यासाठी याचा वापर होतो. इंटरनेटचा वापर करताना अनावश्यक समाज माध्यमांमध्ये गुरफटता कामा नये. इंटरनेट हे 'दुधारी तलवार' आहे हे समजून हाताळावे.

५) प्रश्नपत्रिकांचा भरपूर सराव

स्पर्धा परीक्षेत यश मिळविण्यासाठी भरपूर प्रश्नपत्रिका सोडविण्याचा सराव करावा. पूर्व परीक्षेसाठी ' MCQ' सोडविण्याचा तर मुख्य परीक्षेसाठी दीर्घोत्तरी उत्तर लेखनाचा सराव करणे गरजेचे आहे. चांगली टेस्ट सीरिज लावून विशिष्ट वेळेत प्रश्नपत्रिका सोडविणे ही सर्वात महत्त्वाची बाब आहे. यामुळे वेळेचे नियोजन, परीक्षेचे वातावरण, आपली मानसिकता या सर्व घटकांप्रती आपण स्वयं अनुभूतीने अधिकाधिक सजग बनत जातो.

६) नियोजन आणि प्रभावी अंमलबजावणी

वेळेचे नियोजन दोन पातळ्यांवर करावे लागते - १) दैनंदिन वेळेचे नियोजन - दररोज अभ्यास करताना. २) परीक्षेच्या वेळी पेपर सोडवताना. स्पर्धा परीक्षांची तयारी करताना विद्यार्थी काही प्रश्न नेहमीच विचारतात. ते म्हणजे किती वेळ अभ्यास करावा? कोणत्या घटकाला कितीवेळ द्यावा? तर विद्यार्थी मित्रांनो, आपण अभ्यास किती वेळ करतो याला महत्व नाही तर केलेल्या अभ्यासाची गुणवत्ता काय आहे, हे महत्त्वाचे आहे. दुसरे म्हणजे गतवर्षीच्या प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण करून ज्या घटकावर अधिक प्रश्न विचारले जातात त्या घटकाच्या अभ्यासाला अधिक वेळ देणे गरजेचे असते.

७) ध्येयाप्ती निष्ठा आणि सचोटी

या परीक्षेबाबत टप्प्याटप्प्याने विचार करून ध्येय निश्चित करावे आणि लक्ष विचलित होऊ न देता आपली सर्व ऊर्जा निर्धारित ध्येय गाठण्यावर केंद्रित करावी. 'नेहमीच फोकस्ड राहण्याची वृत्ती' अंगी बाणवावी.

(क्रमशः)

- डॉ. महेश शिरापूरकर

एमपीएससी

महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शासन सेवेतील विविध संवर्गांकरिता भरती प्रक्रिया राबविण्यात येतात. आयोगाच्या कोणत्या परीक्षांमधून कोणती पदे भरली जातात ते आपण या आधी पाहिले. त्यानुसार सन २०२३ पासून सर्व विभागांच्या राजपत्रित संवर्गातील पदभरतीसाठी महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा घेण्यात येत आहे.

वेगवेगळ्या परीक्षांसाठी आवश्यक वेगवेगळ्या गुणवत्ता राखण्यासाठी उमेदवारांना सतत करावे लागणारे प्रयत्न आणि इतर अनुषंगिक बाबींचा साकल्याने विचार करून भरती प्रक्रियेचे नियोजन सुकर व्हावे या उद्देशाने राजपत्रित संवर्गांसाठीच्या परीक्षांसाठी एकच संयुक्त पूर्व परीक्षा आयोजित करण्यात येते आणि गट ब व गट क संवर्गांसाठीच्या परीक्षांसाठी एकच संयुक्त पूर्व परीक्षा घेण्यात येते. राजपत्रित संवर्गांसाठीच्या परीक्षांचे स्वरूप पुढीलप्रमाणे असणार आहे :

'महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा' (Maharashtra Gazetted Civil Services Combined Preliminary Examination) या नावाने एकच संयुक्त पूर्व परीक्षा घेण्यात येते. ही संयुक्त 'पूर्व परीक्षा' राज्यसेवा आणि अभियांत्रिकी सेवा, वन सेवा, कृषी सेवा, अन्न व औषध प्रशासकीय सेवा, आणि वैध मापन शास्त्र या सेवांसाठीच्या सर्व गट-अ व गट ब राजपत्रित संवर्गातील पदभरतीकरिता असते.

स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून भरण्यात येणाऱ्या सर्व राजपत्रित गट-अ व गट-ब संवर्गांकरिता महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व स्पर्धा परीक्षेद्वारे भरतीप्रक्रिया राबविण्यात येईल.

सर्व राजपत्रित गट-अ व गट-ब संवर्गांकरिता त्या त्या संवर्गांसाठी स्वतंत्रपणे मुख्य परीक्षा आयोजित करण्यात येते.

महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षेकरिता उमेदवारांकडून अर्ज घेताना त्या त्या संवर्गांकरिता आवश्यक अर्हतेच्या आधारे संवर्गाचा विकल्प (Option) घेण्यात येतो. उमेदवारांनी दिलेले विकल्प आणि भरावयाची पदसंख्या यांच्या आधारे त्या-त्या संवर्गांच्या मुख्य परीक्षेसाठी निवड करावच्या उमेदवारांची संख्या निश्चित करण्यात येते. आणि त्या आधारे प्रत्येक संवर्गांकरीता पूर्व परीक्षेचा स्वतंत्र निकाल जाहीर करण्यात येतो.

महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षेतून मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांकरिता प्रत्येक संवर्गासाठी स्वतंत्रपणे मुख्य परीक्षा घेण्यात येते. त्या-त्या सेवांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या स्वतंत्र मुख्य परीक्षा आणि त्यातून भरण्यात येणाऱ्या पदांचे संवर्ग पुढीलप्रमाणे:

१) राज्य सेवा मुख्य परीक्षा (एकूण ३४ संवर्ग)
२) महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा (एकूण ५ संवर्ग)
३) महाराष्ट्र यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा (एकूण १ संवर्ग)
४) महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा (एकूण १ संवर्ग)
५) महाराष्ट्र विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा (एकूण २ संवर्ग)
६) महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा (एकूण २ संवर्ग)
७) महाराष्ट्र कृषी सेवा मुख्य परीक्षा (एकूण ३ संवर्ग)
८) अन्न व औषध प्रशासकीय सेवा मुख्य परीक्षा (एकूण २ संवर्ग)
९) निरीक्षक, वैध मापन शास्त्र मुख्य परीक्षा (एकूण १ संवर्ग)

प्रत्येक संवर्गामध्ये किती पदांसाठी भरती होणार आहे याचा तपशील आयोग आपल्या जाहिरातीमध्ये देतो. काही वेळा एखाद्या संवर्गात भरतीसाठी शासनाकडून मागणी नसते. अशा वेळी ते संवर्ग किंवा ती सेवा वगळून जेवढ्या संवर्गांसाठी भरती होणार आहे त्यांची माहिती आयोग जाहिरातीमध्ये नमूद करतो.

(क्रमशः)

- फारुक नाईकवाडे

मधुमेहग्रस्तांना कॅल्शियमपूरक औषधांमुळे हृदयरोगाचा धोका

आरोग्य वार्ता

नवी दिल्ली : तुम्हाला मधुमेह असेल तर काळजी घ्या आणि दररोज कॅल्शियम सप्लिमेंट्स घेतल्यास हृदयविकाराचा धोका वाढू शकतो, असे संशोधनातून समोर आले आहे.

कॅल्शियम आपल्या शरीराच्या विकासासाठी खूप जरुरी आहे. कॅल्शियममुळे हाडांचा आणि दातांचा विकास होतो. तसेच हृदयाचे ठोके नियंत्रित केले जातात. आपल्या शरीरात १००० मिलीग्रामपासून १५०० मिलीग्राम प्रति दिन कॅल्शियम जरुरी असते. शरीरातील कॅल्शियम कमी असेल तर डॉक्टर, कॅल्शियमचे जास्त सेवन करण्याचा सल्ला देतात, मात्र रोज कॅल्शियम सप्लिमेंट्सचे सेवन करणे शरीरासाठी फायद्याऐवजी नुकसानकारक ठरू शकते. मोठ्या प्रमाणात कॅल्शियम घेतल्याने सूज येते आणि बद्धकोष्ठता होऊ शकते.

यूके बायोबँकने ४,००,००० पेक्षा अधिक लोकांचा अभ्यास केला. कॅल्शियम सप्लिमेंट्सचे जर अनेक दिवसांपर्यंत सेवन केले तर त्यांना हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. तसेच मधुमेह रुग्णाचा मृत्यू होऊ शकतो, हे संशोधनातून समोर आले आहे. संशोधनात केलेल्या अभ्यासानुसार ज्या लोकांना कॅल्शियम सप्लिमेंट्स घेण्याची सवय आहे, अशा लोकांमध्ये हृदयरोगाचा धोका असतो आणि त्यांना मृत्युचा धोका हा ६० टक्के वाढू शकतो. तसेच ज्यांना मधुमेह नाही, अशा लोकांना कोणताही धोका पोहोचत नाही.

मोटरमन तणावग्रस्त

मध्य रेल्वेवर ३० टक्के जागा रिक्त; कामाचा ताण

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : मध्य रेल्वेच्या मुंबई विभागातील मोटरमन प्रचंड तणाखाखाली असून, मोटरमनचा मृत्यू होण्याच्या घटना घडत आहेत. त्यातच मोटरमनच्या जवळपास ३० टक्के जागा रिक्त असल्याने, उर्वरित मोटरमनवर कामाचा ताण वाढला आहे.

माहिती अधिकार कार्यकर्ते अजय बोस यांनी माहिती अधिकारांतर्गत मिळवलेल्या माहितीनुसार, मध्य रेल्वेच्या मुंबई विभागात मंजूर १,०७६ पदांपैकी ३१३ मोटरमन पदे रिक्त आहेत. तर, फक्त ७६३ मोटरमन कार्यरत आहेत. मोटरमनची जवळपास ३० टक्के पदे रिक्त आहेत.

रिक्त पदामुळे केवळ मोटरमन तणावाखाली नसून याचा परिणाम दैनंदिन लोकल फेऱ्यांवर होत आहे. मध्य रेल्वेवर दररोज १,८०१ लोकल फेऱ्या धावत आहेत. कामाचे तास वाढल्याने मोटरमनला येणारा थकवा आणि संभाव्य अपघात वेळीच रोखणे आवश्यक आहे. तसेच मोटरमनची रिक्त पदे तातडीने भरणे आवश्यक असल्याचे बोस यांनी सांगितले.

तब्बल, ३१३ मोटरमनची पदे रिक्त असल्याने, लोकल फेऱ्या चालवण्यासाठी इतर मोटरमनला जादा तास काम करावे लागत आहे. काही दिवसांपासून मोटरमन मुरधीधर शर्मा यांचा कामाच्या तणावामुळे रेल्वे अपघातात मृत्यू झाल्याचा दावा रेल्वे कर्मचारी संघटनेकडून करण्यात आला होता. जादा तास काम केल्याने मोटरमन शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या खचून जातो. तसेच मोटरमनच्या कमतरतेमुळे हक्काच्या सुट्ट्या घेताना अडचणी येत आहेत. कुटुंबीयाकडे दुर्लक्ष झाल्याने कौटुंबिक वातावरण बिघडत आहे, असे काही मोटरमनकडून सांगण्यात आले.

आरोग्यावर गंभीर परिणाम

रिक्त जागांमुळे इतर मोटरमनच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे. अवेळी जेवण, कुटुंबीयांना वेळ न देता येणे, उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये रजा घेणेदेखील कठीण झाले आहे. त्यामुळे रिक्त पदे तातडीने भरणे आवश्यक आहे, असे सेंट्रल रेल्वे मजदूर संघाकडून सांगण्यात आले.

प्रवाशांच्या जिवाशी खेळ

भरती प्रक्रिया रखडत सुरू असल्याने, मोटरमनसह अनेक पदे रिक्त आहेत. त्यामुळे प्रवाशांच्या जिवाशी खेळ सुरू आहे. कर्मचारी वर्गाचा कामाचा ताण वाढला आहे. तसेच कंत्राटी पद्धतीने कामगार भरती केल्याने, भरीव कामगिरी होत नाही, असे रेल्वे कर्मचारी संघटनेकडून सांगण्यात आले.

'जेएसपीएम' विद्यापीठातर्फे डॉ. गंगाखेडकर यांचा सन्मान

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : जेएसपीएम विद्यापीठाच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रमण गंगाखेडकर यांचा आरोग्य क्षेत्रातील कार्यासाठी आरोग्यमंत्री आणि संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. तानाजी सावंत यांच्या हस्ते विशेष पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

नाथ इंडस्ट्रीजचे संस्थापक-अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, आरएससीओई संस्थेचे माजी प्राचार्य डॉ. पी. पी. विटकर, लखनऊ विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. एस. बी. निमसे, संस्थेचे अध्यक्ष डॉ. रवी जोशी, कुलगुरू प्रा. बी. बी. आहुजा, शिक्षणतज्ज्ञ अजित थिटे, विद्यापीठाचे कुलसचिव विशाल चौधरी, संचालक अनिल धोसले, कमलाकर उन्हाळकर, कन्हैयालाल बारबोले या वेळी उपस्थित होते. यानिमित्ताने 'स्टार्टअप फेस्ट २०२४'चे आयोजन करण्यात आले होते.

सर्व भारतीयांनी मनाचा निग्रह करून काम केल्यास भारत देश विकसित होण्यास वेळ लागणार नाही, अशी भावना डॉ. गंगाखेडकर यांनी व्यक्त केली.

खासगी बसच्या धडकेत दोन मुली गंभीर जखमी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

वसई : नायगावमध्ये एका खासगी शाळेच्या बसने धडक दिल्यान दोन चिमुकल्या मुली गंभीर जखमी झाल्या आहेत. त्यांच्यावर वसईतील रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांच्या प्रकृतीचा धोका टळला आहे. अमोल नगर परिसरात गुरुवारी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला.

माहिरा (६) आणि गुलशन (२) या बहिणी रस्ता ओलांडत होत्या. त्यावेळी वळण घेत असलेल्या एका शाळेच्या बसने धडक दिली. दोन्ही चिमुकल्या बसच्या चकाखाली आल्या. बसचालक रवी शेट्टी याने बस थांबवली आणि स्थानिकांच्या मदतीने दोघींना रुग्णालयात दाखल केले.

माहिराला मिरा रोडमधील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे तर गुलशनवर वसईच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दोघींच्या प्रकृतीचा धोका टळला आहे. आम्ही बस चालकावर गुन्हा दाखल करून नोटीस दिली आहे, अशी माहिती माणिकपूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजू माने यांनी दिली.

दोन पोलिसांना हत्येच्या गुन्ह्यात अटक

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

वसई : नालासोपारामधील २०१८ साली झालेल्या जोगिंदर राणा याच्या चकमक प्रकरणात ठाण्याच्या विशेष तपास पथकाने नालासोपारामधील दोन पोलिसांना शनिवारी अटक केली. मंगेश चव्हाण आणि मनोज सकपाळ अशी या पोलिसांची नावे आहेत. त्यांना ११ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

२०१८ मध्ये नालासोपारा येथे सराईत गुंड जोगिंदर राणा याचा पोलीस चकमकीत मृत्यू झाला होता. मात्र, ही चकमक बनावट असून माझ्या भावाची हत्या केल्याचा आरोप मयत जोगिंदर राणा याचा भाऊ सुरेंद्र राणा याने केला होता. स्थानिक पोलिसांनी याकडे दुर्लक्ष केले होते. त्यामुळे या प्रकरणात सुरेंद्र राणा याने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यानंतर या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी ठाणे पोलीस उपायुक्तांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना करण्यात आली होती.

सायकलस्वारांनी शनिवारी सायकलपटू आणि इंटेलचे माजी प्रमुख अवतार सिंग सैनी यांना नवी मुंबई महापालिका मुख्यालयासमोरच श्रद्धांजली अर्पण केली. पामबीच मार्गावर २८ फेब्रुवारी रोजी सायकलवरून जात असताना अपघातात सैनी यांना जीव गमवावा लागला होता. सैनी यांना सायकल चालवण्याची प्रचंड आवड होती. सायकलपटूंना नवी मुंबईत सुरक्षित मार्ग हवा अशी अपेक्षा कविता हँडिक यांनी व्यक्त केली.

अंबरनाथमधील शिव मंदिराचा जीर्णोद्धार, सुशोभीकरण

मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत आज भूमिपूजन; केंद्रीय पुरातत्त्व विभागाकडून काम

लोकसत्ता प्रतिनिधी

अंबरनाथ : अंबरनाथ शहरातील शिलाहारकालीन शिव मंदिराचे काही शिल्पं निखळली होती. या मूर्तींच्या जीर्णोद्धाराच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. केंद्रीय पुरातत्त्व विभागाचे अधीक्षक शुभ मजुमदार यांच्या निरीक्षणाखाली विज्ञान आणि रसायन विभागाच्या तज्ज्ञांकडून हे काम सुरू आहे. त्याच वेळी मंदिर परिसर सुशोभीकरण करण्याचे कामही रविवारपासून सुरू होत आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते अयोध्या राम मंदिर न्यासाचे गोविंदगिरी महाराज आणि बाबा रामदेव यांच्या उपस्थितीत याचे भूमिपूजन पार पडणार आहे.

शिव मंदिरावरील काही शिल्पं निखळून पडल्याचा प्रकार ज्येष्ठ प्राच्यविद्या संशोधिका आणि शिव मंदिराच्या अभ्यासिका डॉ. कुमुद कानिटकर यांनी गेल्या महिन्यात समाजमाध्यमांतून समोर आणला होता. सुमारे हजार वर्षांपूर्वीचा हा वारसा झपाट्याने नष्ट होत असल्याबद्दल त्यांनी चिंताही व्यक्त केली होती. याबाबतचे वृत्त 'लोकसत्ता'ने प्रकाशित केले होते. त्याची गंभीर दखल घेऊन केंद्रीय पुरातत्त्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने मंदिर परिसराची पाहणी केली होती. या पाहणीनंतर या प्राचीन वास्तूचे जतनीकरण करण्याच्या दृष्टीने आराखडा तयार करण्यास सुरुवात केली होती. शिव मंदिराच्या सुरक्षेच्या दृष्टीने खासदार डॉ. श्रीकांत शिंदेसुद्धा पाठपुरावा करत आहेत. आता पुरातत्त्व विभागातील वरिष्ठ शिल्पकार सुधीर वाघ आणि रसायनतज्ज्ञ उपेंद्र तोमार यांनी मंदिराच्या मागील बाजूच्या हानी झालेल्या शिल्पांच्या दुरुस्तीचे काम सुरू केले आहे. पुढील काही दिवस हे काम सुरू राहणार आहे.

पुढील आठवड्यात महाशिवरात्री असल्याने हे काम काही काळ थांबेल. पुढे एप्रिल महिन्यापासून शिल्पांच्या डागदुजीचे काम सुरू राहील, अशी माहिती केंद्रीय पुरातत्त्व विभागाचे अधिकारी कैलास शिंदे यांनी दिली आहे.

पिंपरीत ४५ कोटींचे 'मेफेड्रोन' जप्त

पुणे/पिंपरी : पुण्यानंतर आता पिंपरी-चिंचवडमध्येही मेफेड्रोन या अमली पदार्थाचा साठा जप्त करण्यात आला आहे. पिंपरीत ४५ कोटींचे मेफेड्रोन, तर पुण्यात मेफेड्रोन तयार करण्यासाठी लागणारा ३४० किलो कच्चा माल पोलिसांनी छापे टाकून ताब्यात घेतला आहे. या प्रकरणामध्ये सहभाग असल्याचे निदर्शनास आल्यावर पिंपरी-चिंचवड दलातील पोलीस उपनिरीक्षक विकास शेळके याला अटक करण्यात आली आहे.

सांगवी पोलिसांनी पिंपळे निलख रक्षक चौकात शुक्रवारी पहाटे मेफेड्रोन विक्रीसाठी आलेल्या नमामी शंकर झा (वय ३२, रा. निगडी, मूळ रा. बिहार) याला अटक केली. नमामी हा एका हॉटेलमध्ये कामाला आहे. त्याच्याकडे करण्यात आलेल्या चौकशीतून निगडी पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक विकास शेळके याचे नाव समोर आले. पोलिसांनी शेळकेची कसून चौकशी केली. त्याचा सहभाग स्पष्ट झाल्यानंतर मध्यरात्री त्याला अटक केली.

खोकल्याच्या औषधातील घटक पदार्थांचा वापर

खोकल्याचे औषध (कफ सिरप) निर्मितीसाठी ज्या रासायनिक पदार्थांचा वापर केला जातो, त्याच पदार्थांचा वापर मेफेड्रोन, मेथ असे अमली पदार्थ तयार करण्यासाठी केला जात असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

सी. बी. कोरा ग्रामोद्योग संस्थान
खादी आणि ग्रामोद्योग आयोग
Ministry of MSME (Govt. of India)
शिंपोली गाव, गावदेवी मैदाना समोर, बोरीवली (पश्चिम), मुंबई-९२.
गव्हर्नमेंट सर्टिफिकेट कोर्स
टुरिझम क्रॅश कोर्स
टुरिझम उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांकडून सर्व विषयांवर सखोल मार्गदर्शन
विकेन्ड क्लासेस (शनिवार / रविवार)
दिनांक: ९, १०, १६, १७, २३, २४ मार्च २०२४
वेळ: सकाळी ९.३० ते संध्याकाळी ५.००
गव्हर्नमेंट प्रोजेक्ट लोन रु.५० लाख सबसिडी योजनेसह
सुनिल लुकडुके 9769089089 / 9967399519

सी. बी. कोरा ग्रामोद्योग संस्थान
खादी आणि ग्रामोद्योग आयोग
Ministry of MSME (Govt. of India)
शिंपोली गाव, मुन्सीलाल गोकलभोग, बोरीवली (पश्चिम)
गव्हर्मेंट सर्टिफिकेट कोर्स
वारली, कलमकारी पेंटींग कोर्स (४ शनिवार)
०१ मार्च २०२४ पासून प्रात्यक्षिकांसहीत प्रशिक्षण
मधुबनी, फड कोर्स (४ रविवार)
१० मार्च २०२४ पासून प्रात्यक्षिकांसहीत प्रशिक्षण
हर्षला हेमंत सावंत 9820854558
8693098181 / 9820084558

MINISTRY OF HEALTH AND FAMILY WELFARE GOVERNMENT OF INDIA
सत्यमेव जयते

पोलिओवरील विजय कायम राहू द्या जीवनाच्या दोन थेंबांसह

भारत पोलिओ मुक्त आहे. परंतु पोलिओ अजूनही काही देशांमध्ये अस्तित्वात आहे आणि तो पुन्हा येऊ शकतो. आपल्या मुलाचे संपूर्ण संरक्षण सुनिश्चित करा. प्रत्येक वेळी पोलिओची लस दिल्याची खात्री करा जेणेकरून भारत पोलिओवरील विजय कायम ठेवील.

अधिक माहितीकरिता, कृपया संपर्क साधावा-एएसएचए/एएनएम/अंगणवाडी सेविका

अपने बच्चे का सम्पूर्ण टीकाकरण कराएं